नियमित दिवाणी मुकदमा क्र. १६५/२०१२
नि. ३४ लगत

शपथेवर सुरू
उलटतपास वादीतर्फे वकील श्री. आर.एस्.गव्हाणकर यांचेमार्फत

४७. वादी माझा लहान भाऊ आहे. दावा मिळकतीला माझ्या वडीलांचे नांव लागले होते. माझ्या वडीलांच्या मृत्युनंतर दावा मिळकतीला माझ्या नावाची नोंद झाली आहे. माझ्या नावाची नोंद होताना वादीला नोटीस पाठवली की नाही याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा इमला क्र. बी—२१८अ या मिळकतीला माझ्या नावाची नोंद होण्यापूर्वी माझ्या वडीलांच्या नावाची नोंद होती. माझे वडील सन १९८४ मध्ये मयत झाले. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याप्रमाणे वादीसुध्दा माझ्या वडिलांना वारस आहे. दावा इमल्याला मी अर्ज दिल्यामुळे माझ्या नावाची नोंद झाली नाही. दावा इमल्याला माझ्या नावाची नोंद ही पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समिती यांनी केली. ती नोंद कशी केली हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही देव दामोदर भारती मठ या देवस्थानची मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीवर नियंत्रण हे पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा इमला हा दावा मिळकतीत आहे. दिनांक २८/०६/१९८३ रोजी माझ्या वडीलांनी बक्षिसपत्र केले हे मला माहित नाही. त्या बक्षिसपत्राच्या आधारे दावा मिळकत व दावा इमला यांना मी व वादीच्या नावाची नोंद झाली हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत व इमल्यामध्ये माझा व वादीचा सामाईक मालकीभोग्य व कब्जा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत वादीचा निम्मा हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीला मी दावा मिळकतीची दुरूस्ती करू देत नाही व स्वत:ही करीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीला मी दावा मिळकतीचे वाटप करण्यासाठी व दावा मिळकतीची दुरूस्ती करण्यासाठी नकार दिला. हे म्हणणे खरे नाही की, मी फसवणूक करून नगरपालिकेत दावा इमल्याला माझ्या नावाची नोंद करून घेतली.

४८. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत वादीला हिस्सा देण्याची माझी इच्छा नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत व इमल्याकडे वादीचा काहीही संबंध नाही हे मी खोटे सांगतो. माझे वडील मठाधिपती होते. मला वाचता लिहिता येते. कैफियतीतील माहिती माझ्या वकीलांना मी दिली होती. कैफियतीतील माहिती बरोबर आहे याची खात्री झाल्यावर मी त्यावर सहि केली होती. माझे वडील सन १९८४ मध्ये मयत झाले ही माहिती मी माझे वकीलांना दिली होती. सन १९९५ मध्ये माझे वडील मयत झाले असा कैफियतीत लिहिलेला मजकूर खोटा आहे. माझ्या कैफियतीतील माझ्या वडिलांच्या मृत्यूचा दिनांक हा मी सांगितला नव्हता व मी लिहिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वडिलांच्या हयातीत मी देवस्थानचे काम पहात होतो हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, वडिल हयात असताना मी देवस्थाचे काम पहात होतो व तशी नोंद पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीकडे आहे हे मी खोटे सांगतो. आमच्या गिरी कुटुंबाचे एकूण १५ मठाधिपती झालेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मठ हा संन्याशाचा आहे. मी गृहस्थाश्रमी आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीची फसवणुक करून माझ्या नावाची नोंद करून घेतलेली आहे.

४९. हे म्हणणे खरे आहे की, घराच्या उता—याला पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीच्या नावाची नोंद आहे. दावा मिळकतीला माझ्या नावाची नोंद झाली त्याचबरोबर वादीच्या नावाचीसुध्दा नोंद झाली याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीचे नांव दावा मिळकतीतून कमी केले. मी बक्षिसपत्र पाहिले नाही. मी मठाची व्यवस्था पहात असल्यामुळे बक्षिसपत्र कायदेशीर नाही असे माझे म्हणणे आहे. हे म्हणणे खरे नाही की, ते बक्षिसपत्र कायदेशीर, वैध व अंमलपात्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत मी लाईट फिटींग केले, मीटर बसवले हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचा सर्व खर्च मी करतो व तेथील उत्सव मीच करतो हे मी खोटे सांगतो. दावा इमल्यात वीज जोडणी ही माझ्या वडीलांच्या काळापासून आहे. दावा इमल्यात वीज जोडणीसाठी मी माझ्या नावाने अर्ज दिला होता. त्यासाठी मी वडिलांची नाहरकत घेतली नव्हती.

५०. रेमुक्र. १२९/१९९० हा दावा न्यायालयाने काढून टाकलेला आहे. तो दावा वादी हजर नसल्यामुळे काढून टाकला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या भावाला दावा मिळकतीत हिस्सा दयावा लागावा म्हणून मी खोटे बोलतो.

५१. माझ्या चारही बहिणींची लग्ने झालेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, बहिणींच्या लग्नाचा खर्च वादीने केला. हे म्हणणे खरे आहे की, रमाकांत मयत झालेला आहे व तो वेगळा रहात होता. हे म्हणणे खरे नाही की, रमाकांत व चार बहिणींचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही. रमाबाई ही रमाकांतची विधवा पत्नी आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत.

सही/—
(एम्.एस्.बुधवंत)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) ,
सावंतवाडी.

दिनांक :— १७/०७/२०१७.